राज्य निवडणूक विभाग नव्याने निर्माण करणे व या
<u>विभागासाठी नवीन १२८ पदे निर्माण करणेबाबत...</u>

महाराष्ट्र शासन
सामान्य प्रशासन विभाग
शासन निर्णय क्रमांकः आढावा-१८१९/प्र.क्र.१७/१९अ

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२
तारीख: १४ ऑगस्ट २०१९

<u>**वाचा :**</u> (१) भारत निवडणूक आयोग, केंद्र शासन, नवी दिल्ली यांचे पत्र क्रमांक : १५४/State Structure/२०१३-EPS/३८९, दिनांक ४ मार्च २०१४

(२) वित्त विभागाचे पत्र क्रमांक-पदनि-२०१८/प्र.क्र.११८/१८/आपुक, दिनांक ३० मार्च २०१९

<u>**प्रस्तावना**</u>

भारत निवडणूक आयोगाने उपरोक्त संदर्भाधीन क्रमांक-१, दिनांक ४ मार्च २०१४ च्या पत्रान्वये निवडणूकीच्या काळात व निवडणूका नसतानाच्या कालावधीत मुख्य निवडणूक अधिकारी, महाराष्ट्र राज्य कार्यालय आणि त्यांच्या अधिपत्याखालील जिल्हा व तालुका स्तरावरील क्षेत्रीय कार्यालये यांच्यासाठी आकृतीबंध निश्चित केला आहे. त्यानुसार मुख्य निवडणूक अधिकारी कार्यालय व क्षेत्रीय कार्यालयाची संरचना करण्याच्या सूचना दिल्या आहेत. निवडणुकीचे कामकाज हे अत्यंत संवेदनशील, महत्त्वाचे तसेच कालमर्यादेत असल्याने, भारत निवडणूक आयोगाने राज्यातील मुख्य निवडणूक अधिकाऱ्यांच्या कार्यालयात निश्चित केलेल्या आकृतीबंधानुसार नवीन पदांची निर्मिती करण्याचे निर्देश दिलेले आहेत.

२. मुख्य निवडणूक अधिकारी कार्यालयामार्फत (सामान्य प्रशासन विभाग/ कार्यासन-३३) निवडणूक विषयक कामकाजात लोकसभा, राज्यसभा, महाराष्ट्र विधानसभा व विधान परिषद यांच्या निवडणूकांचे संचालन केले जाते. लोकसभा / विधानसभा सार्वत्रिक निवडणुकांचे कामकाजाव्यतिरिक्त या दोन्ही सभागृहांच्या पोट-निवडणुका, राज्यसभेच्या तसेच विधान परिषदेच्या द्विवार्षिक / पोटनिवडणुकांचे कार्यक्रम भारत निवडणूक आयोगाकडून सतत घोषित होत असतात व त्यानुषंगाने वर्षभर निवडणुकांचे

कामकाज चालू राहते. भारत निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार राज्यात दरवर्षी दिनांक १ जानेवारी या अर्हता दिनांकावर आधारित मतदार नोंदणी मोहिम सुरु करण्यात येते. यामध्ये मतदार जागृतीसाठी राष्ट्रीय मतदार दिवस, महिला दिन इत्यादीं सारख्या कार्यक्रमातून मोहिम आखण्याबाबत आयोगाच्या सूचना आहेत.

३. भारत निवडणूक आयोगाने मतदानाची टक्केवारी वाढण्यासाठी मतदारांमध्ये जागृती करण्यासाठी SVEEP (Systematic Voter॰s Education and Electoral Participation) हा कार्यक्रम सुरु केला आहे. सर्वोच्च न्यायालयाच्या निर्देशानुसार लोकसभा सार्वत्रिक निवडणुकांसाठी सर्व मतदान केंद्रांवर EVM सोबत VVPAT चा देखील वापर करण्यात येत असल्याने, यासाठी EVM व VVPATs ची नोंदणी करणे व त्यांची साठवणुक करणे याबाबतची कार्यवाही सुरु आहे. निवडणुकीचे कामकाज हे अत्यंत संवेदनशील, महत्त्वाचे तसेच कालमर्यादेत असल्याने, या कामासाठी अधिकच्या कर्मचारीवृंदाची आवश्यकता आहे. यासाठी राज्यात निवडणूकीच्या कामकाजासाठी स्वतंत्र विभाग व निवडणूकीच्या कामकाजासाठी विविध संवर्गातील १२८ पदे नव्याने निर्माण करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

<u>शासन निर्णय</u>

भारत निवडणूक आयोगाने मुख्य निवडणूक अधिकारी कार्यालय व क्षेत्रीय कार्यालयाची संरचना करण्याच्या दिलेल्या सूचनेनुसार, सामान्य प्रशासन विभागाच्या आस्थापनेवरील कार्यासन-३३ (निवडणूक शाखा) अंतर्गत कार्यान्वित असलेल्या मुख्य निवडणूक अधिकारी, महाराष्ट्र राज्य कार्यालय ऐवजी "राज्य निवडणूक विभाग" म्हणून स्वतंत्र विभाग निर्माण करण्यास शासन मान्यता देण्यात येत आहे. याबाबतची अधिसूचना स्वतंत्रपणे यथावकाश निर्गमित करण्यात येईल.

२. भारत निवडणूक आयोगाने निश्चित केलेल्या आकृतीबंधानुसार महाराष्ट्र राज्यात निवडणूकाच्या काळात व निवडणूका नसतानाच्या कालावधीत मुख्य निवडणूक अधिकारी, महाराष्ट्र राज्य कार्यालयासाठी ९ कक्ष स्थापन करण्यासाठी खालील तक्त्यात दर्शविल्यानुसार १२८ पदे नव्याने निर्माण करण्यास शासन मान्यता देण्यात येत आहे.

अ.क्र.	पदनाम	सातव्या वेतन आयोगानुसार सुधारित वेतन मॅट्रिक्स संरचना	नव्याने निर्माण करावयाची पदे
१	२	३	४
१	अतिरिक्त मुख्य निवडणूक अधिकारी	एल-१३ रु.१२३१००-२१५९००	२
२	सहमुख्य निवडणूक अधिकारी	एस-२५ रु.७८८००-२०९२००	१
३	उपमुख्य निवडणूक अधिकारी	एस-२३ रु.६७७००-२०८७००	१
४	सहायक मुख्य निवडणूक अधिकारी	एस-२० रु.५६१००-१७७५००	४
५	कक्ष अधिकारी	एस-१७ रु.४७६००-१५११००	१२
६	उच्चश्रेणी लघुलेखक	एस-१५ रु.४१८००-१३२३००	१
७	सहायक कक्ष अधिकारी	एस-१४ रु.३८६००-१२२८००	२३
८	डाटा एन्ट्री ऑपरेटर	एस-७ रु.२१७००-६९१००	२३
९	लिपिक-टंकलेखक	एस-६ रु.१९९००-६३२००	४१
१०	शिपाई	एस-१ रु.१५०००-४७६००	२०
---			१२८
टीप : अ.क्र.१ येथील अधिकाऱ्याची वेतन संरचना केंद्रीय सातव्या वेतन आयोगानुसार व अ.क्र २ ते १० येथील अधिकारी / कर्मचाऱ्यांची वेतन संरचना राज्य सातव्या वेतन आयोगानुसार दर्शविण्यात आली आहे.			

३. वरील १२८ पदे खालील अटी व शर्तीच्या अधीन भरण्यात यावी...

(१) अतिरिक्त मुख्य निवडणूक अधिकारी, सहमुख्य निवडणूक अधिकारी, उपमुख्य निवडणूक अधिकारी, सहायक मुख्य निवडणूक अधिकारी, कक्ष अधिकारी, उच्चश्रेणी लघुलेखक, सहायक, लिपिक या संवर्गातील पदे नियमित स्वरुपात भरण्यात यावीत.

(२) डाटा एन्ट्री ऑपरेटर व शिपाई संवर्गातील पदांवर निवडणूक शाखेने बाह्य यंत्रणेव्दारे (Outsourcing) कर्मचारी उपलब्ध करुन घ्यावेत. त्यासाठी वित्त विभागाच्या दिनांक २७ सप्टेंबर २०१०, २ फेब्रुवारी २०१३, २ ऑक्टोबर २०१३ व २ ऑगस्ट २०१६ च्या शासन परिपत्रकातील तरतुदींचे काटेकोरपणे पालन करावे.

(३) उक्त पदांचे सेवाप्रवेश नियम तसेच संबंधित पदांची कर्तव्ये व जबाबदाऱ्या कार्यासन-३३ (निवडणूक) यांनी सामान्य प्रशासन विभागामार्फत विहित करुन घेण्याची दक्षता घ्यावी.

४. सामान्य प्रशासन विभागाच्या आस्थापनेवरील कार्यासन-३३ (निवडणूक शाखा) अंतर्गत मुख्य निवडणूक अधिकारी, महाराष्ट्र राज्य कार्यालयातील खालील विविध संवर्गातील अधिकारी /

कर्मचारीवृंदांचे राज्य निवडणूक विभागात कायमस्वरुपी समावेशन करण्यास शासन मान्यता देण्यात येत आहे.

अ.क्र.	पदनाम	सातव्या वेतन आयोगानुसार सुधारित वेतन मॅट्रिक्स संरचना	एकूण मंजूर पदे
१	२	३	४
१	अपर मुख्य सचिव / प्रधान सचिव / सचिव (मुख्य निवडणूक अधिकारी)	एल-१७ रु.२५५००० (Fixed) एल-१५ रु.१८२२००-२२४१००	१
२	सहमुख्य निवडणूक अधिकारी	एस-२५ रु.७८८००-२०९२००	१
३	उपमुख्य निवडणूक अधिकारी	एस-२३ रु.६७७००-२०८७००	२
४	कक्ष अधिकारी	एस-१७ रु.४७६००-१५११००	३
५	उच्चश्रेणी लघुलेखक	एस-१५ रु.४१८००-१३२३००	३
६	निम्नश्रेणी लघुलेखक	एस-१४ रु.३८६००-१२२८००	१
७	सहायक कक्ष अधिकारी	एस-१४ रु.३८६००-१२२८००	७
८	लिपिक-टंकलेखक	एस-६ रु.१९९००-६३२००	७
९	वाहनचालक	एस-६ रु.१९९००-६३२००	२
१०	शिपाई	एस-१ रु.१५०००-४७६००	६
---			३३
टीप : अ.क्र.१ येथील अधिकाऱ्याची वेतन संरचना केंद्रीय सातव्या वेतन आयोगानुसार व अ.क्र २ ते १० येथील अधिकारी / कर्मचाऱ्यांची वेतन संरचना राज्य सातव्या वेतन आयोगानुसार दर्शविण्यात आली आहे.			

५. वरील विविध संवर्गातील ३३ अधिकारी / कर्मचाऱ्यांचे राज्य निवडणूक विभागात कायमस्वरुपी समावेशन केल्याने, राज्य निवडणूक विभागासाठी विविध संवर्गातील खालील १६१ पदे मंजूर असतील.

अ.क्र.	पदनाम	सातव्या वेतन आयोगानुसार सुधारित वेतन मॅट्रिक्स संरचना	एकूण मंजूर पदे
१	२	३	४
१	अपर मुख्य सचिव / प्रधान सचिव / सचिव (मुख्य निवडणूक अधिकारी)	एल-१७ रु.२५५००० (Fixed) एल-१५ रु.१८२२००-२२४१००	१
२	अतिरिक्त मुख्य निवडणूक अधिकारी	एल-१३ रु.१२३१००-२१५९००	२
३	सहमुख्य निवडणूक अधिकारी	एस-२५ रु.७८८००-२०९२००	२
४	उपमुख्य निवडणूक अधिकारी	एस-२३ रु.६७७००-२०८७००	३
५	सहायक मुख्य निवडणूक अधिकारी	एस-२० रु.५६१००-१७७५००	४
६	कक्ष अधिकारी	एस-१७ रु.४७६००-१५११००	१५

१	२	३	४
७	उच्चश्रेणी लघुलेखक	एस-१५ रु.४१८००-१३२३००	४
८	निम्नश्रेणी लघुलेखक	एस-१४ रु.३८६००-१२२८००	१
९	सहायक कक्ष अधिकारी	एस-१४ रु.३८६००-१२२८००	३०
१०	डाटा एन्ट्री ऑपरेटर	एस-७ रु.२१७००-६९१००	२३
११	लिपिक-टंकलेखक	एस-६ रु.१९९००-६३२००	४८
१२	वाहनचालक	एस-६ रु.१९९००-६३२००	२
१३	शिपाई	एस-१ रु.१५०००-४७६००	२६
---			१६१
टीप : अ.क्र.१ व २ येथील अधिकाऱ्यांची वेतन संरचना केंद्रीय सातव्या वेतन आयोगानुसार व अ.क्र ३ ते १३ येथील अधिकारी / कर्मचाऱ्यांची वेतन संरचना राज्य सातव्या वेतन आयोगानुसार दर्शविण्यात आली आहे.			

६. नवनिर्मित १२८ पदांसाठी सातव्या वेतन आयोगानुसार सुधारित वेतन मॅट्रिक्सनुसार अधिकारी / कर्मचाऱ्यांच्या वेतन व भत्त्यापोटी तसेच कार्यालयीन साहित्य व लेखनसामुग्री खरेदीपोटी सन २०१९-२० या वित्तीय वर्षाकरिता मागणी क्रमांक-ए-२, २०१५-निवडणूका, (१०२) निवडणूक अधिकारी, (००)(०१) निवडणूक अधिकारी (२०१५ ००१२) या लेखाशीर्षाखाली रु.६.१६ कोटी इतका आवर्ती खर्च तसेच रु.१.०२ कोटी इतका अनावर्ती खर्च मंजूर करण्यात येत आहे. सदरचा खर्च या लेखाशीर्षामधून भागविण्यात यावा.

७. नवनिर्मित राज्य निवडणूक विभागामुळे तसेच सदर विभाग कार्यान्वित करण्यासाठी नवीन १२८ पदनिर्मितीमुळे आवश्यकतेनुसार निधीची उपलब्धता कार्यासन-३३ (निवडणूक) यांनी विहित कार्यपद्धती अवलंबून करुन घ्यावी.

८. राज्य निवडणूक विभाग नव्याने निर्माण झाल्याने, मागणी क्रमांक-ए-२, २०१५-निवडणूका, (१०२) निवडणूक अधिकारी, (००)(०१) निवडणूक अधिकारी (२०१५ ००१२) हा लेखाशीर्ष विहित कार्यपद्धतीचा अवलंब करुन, कार्यासन-३३ (निवडणूक शाखा) यांनी हस्तांतरित करुन घ्यावा.

९. हा शासन निर्णय, मा.उपसमितीच्या दिनांक २६ ऑक्टोबर २०१८ च्या बैठकीत व मा.उच्चस्तरीय सचिव समितीच्या दिनांक १५ डिसेंबर २०१८ च्या नवव्या बैठकीत घेतलेल्या निर्णयानुसार तसेच

मा.मंत्रिमंडळाने दिनांक ७ ऑगस्ट २०१९ च्या २३२ व्या बैठकीत घेतलेल्या निर्णयानुसार निर्गमित करण्यात येत आहे.

१०. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१९०८१४१५२५४७७२०७ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Digitally signed by Sitaram Janardan Kunte
Date: 2019.08.14 17:27:45 +05'30'

(सीताराम कुंटे)
अपर मुख्य सचिव (सेवा), महाराष्ट्र शासन.

प्रत,

१) मा.राज्यपाल यांचे सचिव, राजभवन, मलबार हिल, मुंबई.
२) मा.मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव.
३) सर्व मा.मंत्री / मा.राज्यमंत्री यांचे स्वीय सहायक.
४) मा.विरोधी पक्षनेता, विधान परिषद / विधान सभा, विधानभवन, मुंबई.
५) सर्व मा.विधान परिषद सदस्य / मा.विधान सभा सदस्य, विधान भवन, मुंबई.
६) मा.मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य.
७) सर्व मंत्रालयीन विभागांचे सर्व अपर मुख्य सचिव / प्रधान सचिव / सचिव.
८) प्रधान सचिव व मुख्य निवडणूक अधिकारी.
९) प्रधान सचिव, विधान परिषद / विधान सभा, महाराष्ट्र विधान मंडळ सचिवालय, मुंबई.
१०) महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र-१, मुंबई.
११) महालेखापाल (लेखा परीक्षा), महाराष्ट्र-१, मुंबई.
१२) महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र-२, नागपूर.
१३) महालेखापाल (लेखा परीक्षा), महाराष्ट्र-२, नागपूर.
१४) ** प्रबंधक, मूळ शाखा, उच्च न्यायालय, मुंबई.
१५) ** प्रबंधक, अपील शाखा, उच्च न्यायालय, मुंबई.
१६) ** प्रबंधक, महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण, मुंबई / नागपूर / औरंगाबाद.
१७) ** प्रबंधक, लोक आयुक्त व उपलोक आयुक्त यांचे कार्यालय, मुंबई.

१८) ** सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई.
१९) ** आयुक्त, राज्य निवडणूक आयोग, नवीन प्रशासकीय भवन, मंत्रालय, मुंबई.
२०) मुख्य माहिती आयुक्त, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
२१) सर्व आयुक्त, राज्य माहिती आयोग.
२२) राज्य मुख्य सेवा हक्क आयुक्त, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
२३) सर्व विभागीय आयुक्त / सर्व जिल्हाधिकारी, महाराष्ट्र राज्य.
२४) संचालक, लेखा व कोषागारे, मुंबई.
२५) अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई.
२६) निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई.
२७) मुख्य लेखा परीक्षक, स्थानिक निधी लेखा, नवी मुंबई.
२८) बहुजन समाज पार्टी, डी-१ इन्सा हटमेंट, आझाद मैदान, मुंबई-१.
२९) भारतीय जनता पार्टी, महाराष्ट्र प्रदेश, सी.डी.ओ., बॅरॅक क्रमांक-१, योगक्षेमसमोर, वसंतराव भागवत चौक, नरीमन पॉईंट, मुंबई-२०.
३०) भारतीय कम्युनिस्ट पार्टी, महाराष्ट्र कमिटी, ३१४ राजभुवन, एस.व्ही.पटेल रोड, मुंबई-४.
३१) भारतीय कम्यनिस्ट पार्टी (मार्क्सवादी), महाराष्ट्र कमिटी, जनशक्ती हॉल, ग्लोब मिल पॅलेस, वरळी, मुंबई-१३.
३२) इंडियन नॅशनल कॉंग्रेस, महाराष्ट्र प्रदेश कॉंगेस (आय) समिती, टिळक भवन, काकासाहेब गाडगीळ मार्ग, दादर, मुंबई-२५.
३३) नॅशनलिस्ट कॉंग्रेस पार्टी, राष्ट्रवादी भवन, फ्री प्रेस जर्नल मार्ग, नरीमन पॉईंट, मुंबई-२१.
३४) शिवसेना, शिवसेना भवन, गडकरी चौक, दादर, मुंबई-२८.
३५) सर्व मंत्रालयीन विभाग.
३६) कक्ष अधिकारी (कार्यासन-आपुक व व्यय-४), वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई.
३७) सर्व सहसचिव / उपसचिव / अवर सचिव / कक्ष अधिकारी, सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई.
३८) निवडनस्ती / कार्यासन-१९अ.

*** * पत्राने**